# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.12.2025** **वार:शनिवार**

1. आशियातील सर्वात मोठं जागतिक क्षमता केंद्र मुंबईत होणार
2. महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
3. 2027 जनगणनेसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाकडून 11 हजार 718 कोटी रुपयांचा निधी मंजूर आणि
4. नाशिक तपोवनातील झाडं न तोडण्याचे हरित लवादाचे नाशिक महापालिकेला आदेश

**GCC**

आशियातील सर्वात मोठं GCC म्हणजे जागतिक क्षमता केंद्र मुंबईत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे राज्यात 15 हजार थेट आणि 30 हजार अप्रत्यक्ष असे एकंदर 45 हजार नवीन रोजगार निर्माण होणार आहेत अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे 20 लाख चौरस फूट क्षेत्रावर हे केंद्र उभारणार आहे. याबाबत करार लवकरच केला जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले...

**सागंताना अतिशय आनंद होतोय की आत्ताच ब्रकफील्ड सोबत आम्ही चर्चा करून एक अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट झिरो डाऊन केला आहे. एशियातली किंवा कदाचित जगातली सगळ्यात मोठी जीसीसी ही मुंबईमध्ये करण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. जवळपास वीस लाख स्क्वेअर फूट ही जीसीसी असणार आहे. पंधरा हजार लोकांना डायरेक्ट आणि तीस हजार लोकांना इंडायरेक्ट पंचेचाळीस हजार एम्प्लॉयमेंट तयार करणारी ही जीसीसी असणार आहे, आणि आपला जो प्रयत्न आहे, की महाराष्ट्राला जीसीसी कॅपिटल करायचं त्यादृष्टीनं ही बैठक अत्यंत पॉझिटिव्ह झालेली आहे आणि त्यांनी जवळपास तो निर्णय घेतला आहे लवकरच त्यासंदर्भात आम्ही त्यांच्यासोबत एमओयू देखील साइन करू.**

**नक्षलवादमुक्त राज्य**

राज्य सरकारचं दूरदर्शी धोरण आणि पोलिस दलाच्या समर्पित प्रयत्नांमुळे महाराष्ट्र नक्षलवादमुक्त होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते काल नागपुरात या संदर्भातल्या एका बैठकीत बोलत होते. अतिदुर्गम भागात पोलीस चौक्या उभारून आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करावी, तसंच सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्या अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

**रिक्तपदे**

राज्यातल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची 15 हजार 158 पदे रिक्त असल्याचं ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. शिक्षक उपलब्ध झाल्याशिवाय शिक्षकांच्या स्थानांतराला अनुमती दिली जाणार नाही, असंही ते म्हणाले. सरकारनं या रिक्त जागा मर्यादित कालावधीत भराव्यात अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**भोगवटा-नागपूर**

बृहन्मुंबई महानगर क्षेत्रातील 20 हजार इमारतींना भोगवटा देण्याचा निर्णय शासनानं घेतला असून त्याची अंमलबजावणी कालपासून सुरू झाली असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी काल दिली. या निर्णयाचा थेट लाभ 4 ते 5 लाख सदनिकांना म्हणजे अंदाजे 20 लाख नागरिकांना होणार आहे.

**वर्तुळमार्ग**

पुण्यातील वर्तुळ मार्गाच्या पूर्व भागाचं काम मे 2028 पर्यंत आणि पश्चिमेकडील भागाचं काम मे 2026 पर्यंत पूर्ण होईल अशी माहिती मंत्री दादा भुसे यांनी काल दिली. सदस्य राहुल कुल यांनी पुणे रिंग रोड आणि इतर प्रकल्पासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

**उत्खनन**

पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यात वनीकरणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रात अनधिकृत गौण खनिज उत्खननप्रकरणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चार तहसीलदार, चार मंडल अधिकारी आणि दोन तलाठी यांना निलंबित केलं आहे. आमदार सुनील शेळके यांनी या गैरव्यवहाराबाबत काल विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. उत्खनन प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असून, अधिकारी आठ महिने टाळाटाळ करत अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप शेळके यांनी केला होता.

**जनगणना-मंत्रिमंडळ निर्णय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत वर्ष 2027 मध्ये होणाऱ्या जनगणनेसाठीच्या आर्थिक तरतुदीला मंजूरी देण्यात आली. या डिजिटल जनगणनेसाठी 11 हजार 718 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिल. देशातील ही पहिलीच संपूर्ण डिजिटल जनगणना असणार आहे. दोन टप्प्यात होणाऱ्या या जनगणनेसाठी 30 लाख कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचं सांगताना अश्विनी वैष्णव म्हणाले...

**सेंसर्स दो फेज में होगा। फेज ओने में फोकस रहेगा हाउसहोल्ड के अंदर क्या एमेनिटीज है, हाउसिंग कंडीशन कैसी है, कच्चा घर है, पक्का घर है, घर में कितने रूम्स है, किस तरह से घर में कोई वेहिकल है, घर में इलेक्ट्रिसिटी कनेक्शन कैसा है? थाट विल बे थे बसे फोर फेज त्वो जिसमें बहुत इम्पोर्टेंट है डेमोग्राफिक सोश कल्चरल एंड इकोनॉमिक पैरामीटर का इमशन किया जाएगा पूरी जनसंख्या का ये फेब्रुअरी ट्वेंटी ट्वेंटी सेवेन के हिसाब से किया जाएगा भारत के कानूनों के हिसाब से।**

**काटेकणगी**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दोडामार्ग तालुक्यामधील तळेखोल ह्या लहानश्या गावानं गेल्या काही वर्षात कोकणच्या कंद पिकांच्या जगात नवी ओळख निर्माण केली आहे. इथली काटेकणगी आता गोव्यातल्या बाजारात हमखास विक्री आणि उच्च दराची हमी देणारी ठरली आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**स्थानिकांच्या भाषेत काटेकंद, वनकंद किंवा रानकंद अशी ओळख असलेल्या या कंदाची लागवड तळेखोल मध्ये मोठ्या प्रमाणात होते. यंदाच्या दिवाळीत तर या कंद विक्रीतून लाखो रुपयांची उलाढाल**

**झाली असून शेतकऱ्यांनी आपल्या काटेकणगीचा एक वेगळा ब्रँडच तयार केलाय. गावातल्या बऱ्याच युवकांनी पुढाकार घेत काटेगणगेची शेती व्यवसाय म्हणून स्वीकारली आहे. दिसायला साधा असला तरी हा कंद चव आणि अतिशय पौष्टिकतेमुळे ग्रामीण आणि शहरी बाजारपेठेत आवडता झाला आहे. उकडून, भाजून, भाजी करून किंवा उपवासाला खाण्याचा त्याचा पारंपारिक उपयोग सुद्धा आजही तसाच लोकप्रिय आहे. काटेकणगीची शेती साधारण जून महिन्यापासून सुरुवात होते. अवघ्या चार ते पाच महिन्यात म्हणजेच ऑक्टोबर नोव्हेंबर मध्येच याचं परिपूर्ण पीक जमिनीखाली तयार झालेल असत. संपूर्ण शेती सेंद्रिय खतावर होते. तळेखोलच्या शेतकऱ्यांनी मेहनत, परंपरा आणि नव्या बाजारपेठांचा अभ्यास यांच्या जोरावर एका साध्या रानटी दिसणाऱ्या कंद पिकाचा ब्रँड बनवला आहे. जवळच असणार विर्डी धरण पूर्ण झालं तर या शेतकऱ्यांची स्वप्न अजून उंच भरारी घेतील आणि कणक शेती आणखी व्यापक होईल. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, निलेश जोशी, सिंधुदुर्ग.**

**<u>कुंभमेळा- नाशिक</u>**

नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवनातील 18 शे झाडे तोडण्यावर पुण्यातील हरीत लवादानं काल स्थगिती दिली. कायदेशीर प्रक्रिया राबविल्याशिवाय एकही झाड तोडू नये असे आदेश हरित लवादानं नाशिक महापालिकेला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयातील वकील श्रीराम पिंगळे यानी यासंबंधी पुणे हरित लवादाकडे याचिका दाखल केली होती, त्यावर लवादानं हा निर्णय दिला.

**<u>खाद्य महोत्सव</u>**

महाराष्ट्राच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण खाद्यसंस्कृतीचा दिल्लीकरांना परिचय व्हावा यासाठी महाराष्ट्र सदनात आयोजित महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचं उद्घाटन पाककलातज्ञ विष्णू मनोहर यांच्या हस्ते काल झालं. या महोत्सवात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील महिला बचत गटांनी सहभाग घेतला आहे.

**<u>सानेगुरुजी-जळगाव</u>**

जळगाव शहरातील मानव सेवा विद्यालयात साने गुरुजी जयंतीनिमित्त कथामाला उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक शिक्षक रोज एक कथा परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना सांगतात. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

कथा संपल्यावर शिक्षक विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारून कथेचे तात्पर्य विद्यार्थ्यांना सांगितले जाते. त्याचबरोबर शाळेत साने गुरुजी कथा वाचन उपक्रम देखील सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी वाचन केलेली व ऐकलेली कथा ते आपल्या भाषेत सांगतात. यात उत्कृष्ट कथा सांगणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येते. या कथामालेवर प्रश्नमंजूषा स्पर्धा देखील घेण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी संवेदनशील आणि संस्कारी विद्यार्थी घडावीत तसेच या विद्यार्थ्यांमध्ये कथेतील मूल्य रुजावी हा कथामाला घेण्यामागील उद्देश असल्याचे मुख्याध्यापिका माया अंबटकर आणि मुक्ता पाटील यांनी सांगितले. आकाशवाणी बातम्यांसाठी, राजेश यावलकर, जळगाव.

**<u>वारकरी संत साहित्य संमेलन-जालना</u>**

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, आणि जालना इथलं जेईएस महाविद्यालय जालना यांच्याद्वारे आजपासून 'वारकरी संत साहित्य संमेलन जालना इथं आयोजित

करण्यात आलं आहे. डॉक्टर रामकृष्ण महाराज लहवितकर संमेलनाचे अध्यक्ष असतील अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी दिली. ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाल्यानंतर विविध विषयांवर परिसंवाद, मुलाखती आणि इतर सत्रांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**जंतनिर्मूलन-सदाफळ**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, आणि इतर संस्थांनी मिळून, राहुरी तालुक्यातील कोळेवाडी इथं मेंढ्यांच्या जंत निर्मूलन शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. मेंढीच्या जमिनीलगत चरण्याच्या सवयीमुळे जंताची बाधा होण्याची शक्यता अधिक असते. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या आंतरवासिता विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग घेतला.

**जुनीपेन्शन-नागपूर**

जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या नेतृत्वाखाली नागपूर विधिमंडळावर काल मोर्चा काढण्यात आला. शासनानं जुनी पेन्शन योजना तत्काळ लागू करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**हवामान**

राज्यभरात आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. राज्यात काल सर्वात कमी 7 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस तापमान अहिल्यानगर इथं नोंदवलं गेलं. नाशिकमध्ये 7 पूर्णांक 8 अंश तर पुण्यात 8 पूर्णांक 3 अंश तापमानाची नोंद झाली.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.